महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे - ४११००५
Email id : pmcmco@gmail.com
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/२५४
दिनांक :१९/०४/२०२०

# आदेश

विषय :- कोरोना विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबत आदेश.

संदर्भ :- १) कोविड-१९,प्रतिबंधात्मक उपाययोजनां करिता सुधारित एकत्रित मार्गदर्शक सूचना आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1, दि.१७/०४/२०२०

२) अधिसुचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई, क्र.करोना २०२०/प्र.क्र५८/आरोग्य ५,दि.१४ मार्च २०२०

३) २०२०आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

४) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७

५) मा.आयुक्त ,पुणे महानगरपालिका ,जा.क्र.२८,१३.०४.२०२०

६) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,क्र.जि.आ.व्य./१२४/२०२० पुणे.दिनांक.१५/०३/२०२० यांचे आदेश.

७) पोलिस सह आयुक्त यांचे जा.क्र.४१६७/कोरोना/मनाई/आदेश/२०२०, दि.१४.४.२०२०

ज्याअर्थी,राज्यात कोरोना विषाणुमुळे(COVID) उद्भवलेल्या संसर्गजन्य आजारामुळे पुणे शहरात आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली आहे.

ज्याअर्थी,जागतिक आरोग्य संघटना तसेच आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय,भारत सरकार यांनी या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणास्तव प्रस्तावित केलेल्या विविध उपाय योजनांची प्रभावी अंमलबजावणी व राज्यात कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणास्तव संपूर्ण पुणे महानगरपालिका क्षेत्रात आपत्कालीन उपाययोजना लागू करण्याची व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.पुणे शहरातील कोरोना व्हायरस बाधित पॉझिटिव्ह रुग्णाची संख्या दिवसेंदिवस अधिक वेगाने वाढत आहे. भारतातील कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या विचारात घेता,येत्या काळात पुणे शहरात रुग्णांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे पुणेकरांच्या सार्वजनिक

आरोग्याच्या दृष्टीने संपूर्ण शहरात पुढील काही दिवस नागरिकांच्या हालचालींवर,बाहेर फिरणाऱ्यावर मर्यादा आणणे आवश्यक झाले आहे.

तसेच भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा,२००५ प्रमाणे संभाव्य कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे मानवी आरोग्याला व जीविताला धोका निर्माण होण्याचा संभव आहे.याकरिता कोरोना विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचे प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे आदेश लागू करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी सुरु झालेली आहे .

ज्याअर्थी,पुणे महानगरपालिका हद्दीमधील १५ क्षेत्रिय कार्यालयांपैकी १३ क्षेत्रिय कार्यालयांच्या हद्दीत कोरोना विषाणूचा वाढता प्रभाव पाहता संदर्भ क्र.२ , नुसार एखाद्या भौगोलिक क्षेत्रात उदाहरणार्थ गाव,तालुका,वाडी,कॉलनी इत्यादी मध्ये कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव/उद्रेक आढळल्यास अशा उद्रेकजन्य क्षेत्राबाबत नमूद केलेल्या तसेच प्रसंगानुसार आवश्यक असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी संबधित जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी आहेत.

ज्याअर्थी,आता राज्य शासनाने संदर्भ क्र.१ नुसार कोविड-१९,प्रतिबंधात्मक उपाययोजनां करिता सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गत केल्या आहेत.त्या नुसार राज्यात महापालिके हद्दीमधील हॉटस्पॉट (Hotspots) क्षेत्र वगळता कृषी, मस्य, आर्थिक क्षेत्र,बांधकाम क्षेत्र,ई सुरु राहण्यासाठी काही सूचना केल्या आहेत.

त्याअर्थी,**महाराष्ट्र कोविड-१९,उपाययोजना नियम-२०२० अन्वये संपूर्ण पुणे महानगरपालिका क्षेत्र हे संक्रमनशील (Containment Zone) म्हणून प्रतिबंधित क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात येत आहे**,त्यामुळे संदर्भ क्र.१ मधिल अ.क्र. 3.(ii) अन्वये केवळ जीवनावश्यक सेवा सुरळीत राहण्यासाठी आरोग्य विषयक,कायदा व सुव्यवस्था राखणे संबंधि, महापालिका आणि शासकीय सेवा सुरु राहतील.

तेव्हा, आज रविवार दि. १९ एप्रिल २०२० रोजी मध्यरात्री बारा वाजेपासून पुढील आदेशा पर्यंत पुणे महानगरपालिका हद्द प्रतिबंधित (सील) करण्यात येत आहे.त्यानुसार संबधित पोलीस स्टेशन प्रमुख आपल्या भागाच्या हद्दी प्रतिबंधित (सील) करतील.त्यानुसार महापालिकेच्या हद्दीमध्ये २७.०४.२०२०पर्यंत खालील नमूद सेवा पुरविणार वगळता अन्य व्यक्ती यांना पुणे महापालिका हद्दीत प्रवेश व परिसरातून बाहेर पडण्यास बंदी करण्यात येत आहे.

१) सदर परिसरात जीवनावश्यक वस्तुंचा / अत्यावश्यक सेवा पुरविणारे कार्यालय/ व्यक्तींना व त्यांच्या वाहनांना यामधून वगळण्यात येत आहे.पोलीस आयुक्त,पुणे यांनी या संदर्भात प्रसिद्ध केलेल्या वेळा व व्यवसाय या संबंधीचे आदेश लागू राहतील.

२) सदर आदेशान्वये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नियुक्त अधिकारी/कर्मचारी, कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काम करणारे तसेच पुणे महानगरपालिकेचे

सर्व कर्मचारी व वाहने तसेच शासकीय व सेवा देण्यात येणाऱ्या वाहनांना सदरच्या आदेशानुसार वगळण्यात येत आहे.

३)तसेच पुणे महापालिका क्षेत्रामधील सर्व शासकिय कार्यालयांनी त्यांच्या कार्यालयात केवळ १०% उपस्थिती राखण्या बाबत संदर्भ क्र.१ मधिल अ.क्र.18 (ii) अन्वये नियोजन करणे आवश्यक राहील.शासकीय कार्यालयांना त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक पास महानगर पालिकेमार्फत उपलब्ध करून दिले जातील.

जिल्हा दंडाधिकारी यांचेकडील उपरोक्त संदर्भ क्र.६ च्या आदेशान्वये सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त,पुणे मनपा यांची त्याच्या कार्यक्षेत्राकरिता मनियंत्रण अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली असून संबधित महापालिका सहा.आयुक्त यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात रस्त्यावर विनाकारण फिरणारे/फिरणारा नागरिक आढळल्यास त्याच्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करावी.

हा आदेश आज दिनांक १९ एप्रिल २०२० रोजी माझ्या सही शिक्याने दिला आहे.

(शेखर गायकवाड)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका,पुणे.

प्रत – १)मा.विभागीय आयुक्त,विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

२)मा.पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.

३)जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित